**औदुंबर श्रीमंत कडलास्कर व इतर वि.**
**अर्जुन श्रीमंत कडलास्कर व इतर**

## आदेश निशाणी क्रमांक २१ वर

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांनी कैफियत व म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच, त्यांचेविरूध्द झालेला विना म्हणणे कैफियतीचे आदेश आणि झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द होवून कैफियत व म्हणणे तसेच सोबत दिलेला प्रतिदावा स्वीकारण्यात यावेत यासाठी केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन आक्षेप दर्शविला आहे.

३. प्रतिवादीच्या मते,प्रतिवादी हे वयस्कर असून जगभरात कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजाराची साथ असलेने ते मे. कोर्टात हजर होवून वेळेत कैफियत दाखल करू शकले नाहीत. सबब, न्यायाच्या दृष्टीने त्यांच्याविरुध्द पारीत केलेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येऊन कैफियत व सोबत दिलेला प्रतिदावा दाखल करुन घेण्यात यावी अशी प्रतिवादी याने विनंती केली आहे.

४. वादीच्या मते, प्रतिवादींचा अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. तो वादीस मान्य व कबूल नाही. प्रतिवादींना दिनांक ०४/०८/२०२० रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु प्रतिवादी दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने जाणूनबुजून विलंब करत आहेत. त्यामुळे प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा तसेच, वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर करायचे झालेस तो प्रतिवादींवर जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकारून करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप हावून पृथक क्बजा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दि. ०७/१०/२०२० रोजी प्रतिवादी क्र. १,२ व ४ हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २७/१०/२०२१ रोजी दाखल केला आहे. परंतु दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींस संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास

वादीला प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये झलेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय याबाबत योग्य त्या खर्चाची रक्कम भरणे गरजेचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. ५००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १,२ व ४ यांनी खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेस देण्याची आहे.

३. प्रतिवादी क्र. १,२ व ४ यांचे म्हणणे व कैफियत तसेच सोबत दिलेला प्रतिदावा प्रतिवादीने खर्चाची रक्कम भरल्यानंतर अभिलेखावर नोंद करण्यात येईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

सही/–

दिनांक– १७/०१/२०२२
श्री. एम. आर. कामत

ठिकाण– पंढरपूर
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M. P. Gheradi ( L. G.) |
| Court | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 17/01/2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 17/01/2022 |
| Judgment/Order uploaded on | :- | 17/01/2022 |